क्र. लेखामेळ/आरसीएन-२/वै. सं. /
आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय,
कोकण भवन बेलापूर नवी मुंबई-४००६१४
दिनांक:- / /२००१

12 JUN 2001

8 JUN 2001

विषय:- शासकीय अधिकाऱ्यांना वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

- परिपत्रक -

शासकीय निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रिम १०९६/प्र. क्र. ४१/९६/विनियम दिनांक ३०/१०/९६, वित्त विभाग पूरक पत्र क्रमांक-अग्रिम-१०९८/प्र. क्र. १६/९८/विनियम दिनांक १७/६/९८ आणि शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रिम-१०९९/प्र. क्र. ५७/९९/विनियम दिनांक २५/१/२००१ अन्वये ज्या राजपत्रित अधिकाऱ्यांचे मूळ वेतन रुपये ६५००/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशा अधिकाऱ्यांना त्या शासन निर्णयात विहित केलेल्या अटींच्या अधिन राहून वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी व्याजरहित रुपये ४५०००/- किंवा संगणकाची प्रत्यक्ष किंमत यापैकी जे कमी असेल तेवढया मर्यादेपर्यंत अग्रिम देण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. अधिकाधिक शासकीय अधिकाऱ्यांनी वैयक्तिक संगणक खरेदी करुन आपले संगणकीय ज्ञान वाढवावे, ज्यामुळे शासनाच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्यांचा फायदा व्हावा या उद्देशाने शासनाने ही सुविधा उपलब्ध केलेली आहे.

२/- या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या अग्रिमासंबंधीच्या वैयक्तिक अर्जाची नियमानुसार तपासणी करणे, अर्जदारांचा प्राधान्यक्रम ठरविणे, अग्रिम मंजूर केल्याबाबतचे प्रत्यक्ष आदेश काढणे वगैरे बाबतची जबाबदारी विभाग प्रमुख या नात्याने या कार्यालयाची आहे. प्रथम अग्रिमा संबंधीच्या वैयक्तिक अर्जाची छाननी करण्यात येते आणि नियमानुसार अग्रिम अनुज्ञेय आहे अशी खात्री पटल्यानंतर पात्र अर्जदारांची नावे प्रतिक्षा सूचीत समाविष्ट करण्यासाठी शासन महसूल व वन विभागाकडे पाठविण्यात येतात. शासनाकडून वैयक्तिक संगणक खरेदी अग्रिमासंबंधीची प्रतिक्षा सूची निर्गमित केली जाते. त्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार अग्रीम मंजूरीचे प्रत्यक्ष आदेश पारीत केले जातात.

वैयक्तिक संगणक खरेदी अग्रिमा संबंधीच्या अर्जासाठी कालमर्यादा विहित केलेली नसल्यामुळे या संबंधीचे अर्ज टप्पाटप्याने निरनिराळ्या संदर्भाव्दारे प्राप्त होतात. त्याची तपासणी करुन पात्र अर्जदारांची माहिती प्रतिक्षा सूचीसाठी वेगवेगळया संदर्भाव्दारे शासनाला सादर करावी लागते. या प्रक्रियेमध्ये कालापव्यय होतो. ही प्रक्रिया प्रशासनिक दृष्टया सुलभ होण्यासाठी असा निर्णय घेण्यात आला आहे. की, ज्या अधिकाऱ्यांना वैयक्तिक संगणक खरेदी प्रयोजनासाठी अग्रीम घ्यावयाचे आहे.

त्या अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत आणि त्यांची तपासणी करुन पात्र अर्जदारांची माहित प्रतिक्षा सूचीत समाविष्ट करण्यासाठी एकाच संदर्भाव्दारे शासनाला सादर करण्यात यावी. त्यामुळे खालील सुचना विचारात घेवून सर्व नियंत्रक अधिका-या कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयातील व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील जे राजपत्रित अधिकारी वैयक्तिक संगणक खरेदीसाठी अग्रिम घेण्यात इच्छुक असतील त्यांचे अर्ज प्राप्त करुन आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास दि. ३० जून २००१ पर्यंत सादर करावेत.

१] दि. ३०/१०/९९ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अर्जाच्या नमुन्यातच अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जातील सर्व मुद्यासमोर योग्य तो तपशील नमूद करावा. अर्ज अपूर्ण असल्यास तो विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२] राजपत्रीत अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या अर्जाची नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुखांनी नियमानुसार तपासणी करुन पात्र अर्जदारांचे अर्ज शिफारस करुन सादर करावयाचे आहेत.

३] उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयातील सर्व अटी संबंधीत अधिका-यांच्या निदर्शनास आणाव्यात कारण अग्रिम मंजूर झाल्यानंतर त्याची पूर्तता करणे संबंधित अधिका-यावर बंधनकारक आहे.

४] ज्या राजपत्रित अधिका-यांचे मूळ वेतन रु. ६५००/- पेक्षा कमी आहे. त्यांना अग्रिम अनुज्ञेय नसल्यामुळे त्यांच्या अर्जाची शिफारस करु नये.

५] परिवीक्षाधीन अधिका-यांना अग्रिम अनुज्ञेय नाही. त्यामुळे अशा अधिका-यांच्या अर्जाची शिफारस करु नये.

६] अर्जासोबत संगणक अधिकृत विक्रेत्याचे दरपत्रक सादर करावे.

७] अर्जदारांचा तपशील/माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात संबंधीत कार्यालयाने सादर करावयाची आहे.

८] अर्ज सादर केल्यानंतर एखाद्या अधिका-याची बदली झाल्यास संबंधीत कार्यालयाने याबाबतचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावयाचा आहे.

९] अग्रीमासंबंधीचे अर्ज संबंधीत अधिका-यांनी कार्यालयामार्फतच सादर करावयाचे आहेत. परस्पर शासनाला अर्ज सादर करु नयेत.

१०] महसूल व वन विभागा व्यतिरिक्त अन्य प्रशासकीय विभागातील अधिकारी या यंत्रणेत कार्यरत असतील आणि त्यांनी अग्रिमासाठी अर्ज केला तर तो अर्ज शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. एफएनआर-१०७०/२०७६/फ-१ दि. ९ जून १९७९ अन्वये संबंधित अधिका-यांच्या मूळ विभागाकडे पाठविण्यात यावा.

३/- शासन निर्णयातील तरतूदी व वरील मुद्दे विचारात घेऊन इच्छुक अधिका-यांचे परिपूर्ण अर्ज वर नमूद केलेल्या दिनांकापर्यंत या कार्यालयास पाठवावेत.

क संगणक खरेदी अग्रीमसंबंधी प्राप्त झालेल्या अर्जाचा तपशील/माहिती दर्शविणारे विवरणपत्र.

| निर्यंत्रक अधिकारी / कार्यालय प्रमुख | अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व कार्यालय | मूळ वेतन | वैयक्तिक अर्जाची तारीख | जन्म तारीख | शासकीय सेवेतील निवृत्तीचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | यापूर्वी वैयक्तीक संगणक खरेदीसाठी अग्रिम देण्यात आले आहे काय ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | |

कार्यालय प्रमुख